राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४
Email ID: ropune@dtemaharashtra.gov.in
Web: www.ropune.org.in

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२, ई, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.

---

**कालमर्यादा – ०८/०२/२०२३**

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-१/बदल्या/२०२३/ 384 दि. 20 JAN 2023

प्रति,

प्राचार्य/उपसचिव
सर्व शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण परीक्षा मंडळ विभागीय कार्यालय, पुणे

**विषय- सन २०२३ - नियमित शासकीय सेवकांच्या नियतकालीक बदल्यांबाबत...**
**प्राचार्य/ विभागप्रमुख/अधिव्याख्याते**

संदर्भ- संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.४अ/आस्था(२)/नियमित अध्यापकांच्या बदल्या/२०२३/५० दि.२०/०१/२०२३

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भिय मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्राचे अवलोकन करुन आपल्या संस्थेतील प्राचार्य/विभागप्रमुख/ अधिव्याख्याते या अधिका-यांची माहिती संचालनालयाने दिलेल्या उदाहरणाप्रमाणेच विहीत विवरणपत्र अ,ब,क,ड मध्ये Sakal Marathi font – New Microsoft Excel Worksheet मध्ये तयार करुन **दिनांक ०८/०२/२०२३ पुर्वी** व्दिप्रतीत या कार्यालयांस सादर करावी. सदर माहितीची Softcopy est.ropune@gmail.com व desk4a@dtemaharashtra.gov.in या ईमेलवर पाठवावी.

तसेच माहितीसोबत खालील नमूद प्रमाणपत्र सादर करावे -

"प्रमाणित करण्यात येते की, सन २०२३ – नियमित शासकीय सेवकांच्या नियतकालीक बदल्यांबाबत संस्थेने सादर केलेली माहिती ही संस्थास्तरावर संस्थाप्रमुखांनी व्यक्तिशः तपासलेली असून ती अचूक आहे."

(डॉ.दत्तात्रय व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Endorsement

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४७३/४२४/४३४
ई-मेल—desk४a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http//www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : ४अ/आस्था(२)/नियमित अध्यापकांच्या बदल्या/२०२३/५० दिनांक 20 JAN 2023

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे.
20 JAN 2023
आवक क्र. 639

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद/
अमरावती / नागपूर.

विषय : नियमित शासकीय सेवकांच्या नियतकालीक सन २०२३ बदल्यांबाबत.

संदर्भ : ०१. शासकीय कर्मचा-यांचे बदल्यांचे विनियमन करण्यासाठी आणि शासकीय कर्तव्ये पार पांडताना होणा-या विलंबास प्रतिबंध करण्याकरीता सन २००५ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक -२१

०२. शासन पत्र क्रमांक बदली-४३२३/प्र.क्र.०५/२३/तांशि-७ दिनांक २०/०१/२०२३

संदर्भ क्रमांक २ च्या शासन पत्रान्वये संदर्भ क्रमांक १ चा सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक - २१ दिनांक १२/०५/२००६ मधील तरतूदीनुसार शासकीय तंत्रनिकेतने, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये व तत्सम संस्थातील गट अ व ब संवर्गातील अधिका-यांच्या बदल्यांबाबतचे प्रस्ताव सादर करण्याबाबत सुचित केले आहे. तसेच बदली करण्याबाबत वैयक्तिक निवेदने/शिफारशी तंत्रशिक्षण संचालनालय तसेच शासनास प्राप्त होत असून याबाबत बदली अधिनियम२००५ मधील तरतुदीनुसार माहे एप्रिल मे २०२३ मध्ये नियमानुसार कार्यवाही करणे उचित ठरते. यास्तव संचालनालय स्तरावर प्राप्त झालेली/होणारी बदल्यांसंदर्भातील निवेदने/ शिफारशींवर वैयक्तिक प्रस्ताव सादर न करता नियतकालिक बदल्या २०२३ च्या प्रस्तावात अंतर्भूत करुन सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

शासकीय सेवकांच्या नियतकालिक बदल्यांबाबत संदर्भिय अधिनियमान्वये निश्चित केलेल्या धोरणानुसार दिनांक ३१ मे २०२३ रोजी एकाच पदावर किंवा एकापेक्षा जास्त पदावर एकाच ठिकाणी ३ वर्ष सेवा पूर्ण

करणारे प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्यात्यांची माहिती (नाव आद्याक्षरात न लिहिता संपूर्ण नाव नमूद करून) सोबतच्या विहित प्रपत्र अ, ब, क मध्ये खालील सूचना विचारात घेऊन सादर करावी.

१) प्रशासकीय बदलीसाठी संबंधीतांना वैयक्तिक पसंतीची ३ ठिकाणे कळविण्याची सूचना देऊन त्याचप्रमाणे माहिती सादर करण्यांत यावी. मात्र ज्या प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्याता यांनी बदलीसाठी पसंतीची ठिकाणे दिली नाहीत किंवा तीन पेक्षा कमी ठिकाणे नमूद केलीत त्यांची बदली प्रशासकीय दृष्टीने त्या शिवाय अन्यत्र करण्यांत येईल याची त्यांना जाणीव करून द्यावी.

२) ज्या अध्यापकांनी विनंती बदलीसाठी अर्ज केले आहेत अशा अध्यापकांची माहिती व त्यांचे विनंती बदली अर्ज सहपत्रासह आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह सादर करण्यांत यावेत. तसेच ज्या प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्यात्यांनी त्यांचे जवळचे नातेवाईकांचे आजारपण व त्यांचे स्वत:चे आजारपणासाठी बदलीची विनंती केली असेल अशा प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्यात्यांची विनंती बदली अर्जासोबत पर्याप्त वैद्यकीय कागदपत्रे पुरावा म्हणून देणे आवश्यक असून केवळ एका प्रमाणपत्राचे आधारे विनंती बदली विचारात घेतली जाणार नाही. त्याचप्रमाणे विनंती बदलीसाठी अर्ज प्राचार्य / विभागीय कार्यालयामार्फतच सादर करावेत. संचालनालयास थेट अर्ज सादर करू नये. संचालनालयास थेट अर्ज सादर केल्यास किंवा प्रस्तावाच्या विहित मुदतीनंतर स्वतंत्रपणे प्राप्त झालेला अर्ज विचारात न घेता सदर अर्ज दप्तरी दाखल करण्यांत येतील असे संबंधितांना कळविण्यांत यावे. तसेच दि. ३१/१२/२०२२ पूर्वी

३) बदलीकरीता संचालनालयास सादर केलेल्या विनंती अर्जाचा विचार केला जाणार नसल्याची बाब संबंधितांच्या लक्षात आणून द्यावी.

४) आपल्या विभागांतर्गत येणा-या शासकीय तंत्रनिकेतनात कार्यरत असलेल्या अध्यापकांपैकी ज्या अध्यापकांच्या बाबतीत विद्यार्थ्यांच्या तक्रारी आहेत अथवा त्यांचा शैक्षणिक संपादणुक अहवाल प्रतिकुल आहे अशा प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्यात्यांची नांवे सुध्दा कळवून त्यांची बदली करणे आवश्यक आहे किंवा कसे ? याबाबत आपले स्पष्ट मत / अभिप्राय आवश्यक त्या कागदपत्रासहीत सादर करावी.

५) असे निर्दशनास आले आहे की, संस्थाप्रमुखांनी शिफारशीसह सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने बदल्याबाबत निर्णय घेतल्यानंतर बदली केलेल्या काही प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्यात्यांची बदली रद्द करण्याबाबत संस्थाप्रमुखांकडून विनंती करण्यांत येते. म्हणून याबाबत आपणांस सूचित करण्यांत येते की, संदर्भीय बदल्यांच्या कायद्याचे अवलोकन करून बदली पात्र प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्यात्यांची बदली करावयाची नसल्यास त्यांचे ठोस समर्थन आवश्यक त्या कागदपत्रासहीत देऊन तशी शिफारस करण्यांत यावी. याबाबत बदल्या झाल्यानंतर आपल्याकडून कोणतीही शिफारस आल्यास विचारात घेतली जाणार नाही.

६) बदलीपात्र प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्यात्यांचे पाल्य शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये १० वी किंवा १२ वीत शिकत असल्यास तसे स्पष्टपणे नमूद करून त्याबाबतची कागदपत्रे प्रस्तावासोबत जोडावीत.

७) जे बदलीपात्र प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्याता नजिकच्या कालावधीत डिसेंबर २०२३ पूर्वी सेवानिवृत्त होत आहेत अशा अध्यापकांच्या नावांसमोर ठळक अक्षरात अभिप्राय देण्यांत यावा.

८) जे प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्याता बदलीसाठी राजकीय दबाव आणतील अशा अध्यापकांवर प्रचलित शासन नियमानुसार शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यांत येईल तसेच सदर बाब वार्षिक गोपनिय अहवालात नमूद करण्यांत येईल ही बाब आपल्या अधिपत्याखालील शासकीय तंत्रनिकेतन संस्थेतील प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्यात्यांच्या निदर्शनास आणावी.

९) संदर्भिय अधिनियमात दिलेल्या सर्व तरतूदी व दिनांक १४/०७/२०२१ च्या विभागीय संवर्ग संरचना मधील तरतूदी विचारात घेऊन त्या अनुषंगाने बदल्यांची माहिती दिल्याचे तसेच सोबतच्या विवरणपत्रातील माहिती अचूक व परिपूर्ण असल्याचे प्रमाणित करावे.

१०) जे अध्यापक इतर आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत त्या सर्व अध्यापकांची माहिती मुळ आस्थापनेवरून सादर करावी.

१०) दिनांक १४/०७/२०२१ च्या संवर्ग विभाजनाच्या शासन निर्णयानुसार ज्या अध्यापकांच्या नियुक्त्यांना १ वर्षापेक्षा कमी कालावधी झालेल्या आहे अशा अध्यापकांच्या नावासमोर # चिन्ह दर्शवावे.

आपल्या विभागाअंतर्गत येणा-या शासकीय तंत्रनिकेतनातील नियमित नियुक्तीने कार्यरत असलेल्या सर्व अध्यापकांची माहिती सोबतच्या प्रपत्र क मध्ये विद्याशाखानिहाय व सेवाज्येष्ठतेनुसार सादर करावी. प्रपत्र अ, ब व क मध्ये दर्शविलेल्या उदाहरणाप्रमाणे माहिती Sakal Marathi या फॉन्ट मध्ये New Microsoft Excel Worksheet या नमुन्यातील विहित प्रपत्रात संचालनालयास दिनांक २८ फेब्रूवारी २०२३ पूर्वी निश्चितपणे पाठविण्याची कार्यवाही करावी. तसेच एक प्रत या संचालनालयाच्या desk४a@dtemaharashtra.gov.in या ई-मेल पत्त्यावर सुध्दा पाठविण्यात यावी.

( डॉ. अभय वाघ )
संचालक तंत्रशिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : सचिव, महाराष्ट्र राज्य, तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांना कळविण्यात येते की, त्यांच्या आस्थापनेरील तदर्थ व्यवस्थेने गट अ संवर्गातील प्रशासकीय पदांवर कार्यरत असलेल्या विभागप्रमुख व अधिव्याख्यात्यांची माहिती वरील सूचना विचारात घेऊन दिनांक २८ फेब्रूवारी २०२३ पूर्वी सोबतच्या प्रपत्रात सादर करावी.

## प्रपत्र क

### संस्थेत कार्यरत सर्व अध्यापकांची सविस्तर माहिती

| अनु. क्र. | शासकीय सेवकाचे संपूर्ण नाव | पदनाम | विद्याशाखा | मूळ वेतन/ वेतन पे मॅट्रिक्स/ लेव्हल | जन्म तारीख | सेवानिवृत्तीचा दिनांक | सध्याच्या पदाचा नियमित नियुक्तीचा प्रकार<br>नामनिर्देशन / पदोन्नती | सध्याच्या पदाचा नियमित नियुक्तीचा दिनांक | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेचे नाव | सध्याच्या संस्थेत कार्यरत असल्याचा दिनांक | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेतील एकुण सेवा कालावधी ( नक्षलग्रस्त / आदिवासी भागात कार्यरत स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावा दि.३१.०५.२०२३ पर्यंत) | रकाना क्र. ११ पैकी विनंती वरून अन्यत्र प्रतिनियुक्ती चा कालावधी | प्रशासकीय बदलीसाठी वैयक्तिक पसंतीची तीन (३) ठिकाणे | विनंती बदलसाठी पसंतीची तीन (३) ठिकाणे | विनंती बदलीसाठी तपशीलवार कारण व त्याबाबतची समर्थनिय कागदपत्रे | तक्रारीमुळे बदली करणे अथवा अन्य कारणामुळे बदली न करणे इ. अपेक्षित असल्यास त्याबाबतचे सुस्पष्ट अभिप्राय | सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २१ मधील तरतुदींच्या अनुषंगाने संस्थाप्रमुख / सहसंचालकांची शिफारस | कार्यरत असलेल्या विविध पदावर यापूर्वी विविध संस्थेतील संस्था निहाय सेवाकाळ पदनाम / संस्था / कार्यालय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ |
| १ | श्री. अ ब क | अधिव्याख्याता | स्थापत्य | ५६१०० Level ९A | ०३-०४-१९८२ | ३०-०४-२०४२ | नामनिर्देशन | ०४-१२-२००७ | शातंनि उस्मानाबाद | ०१-०८-२०१० | १२ वर्ष १० महिने | ---- | पुणे<br>कोल्हापूर<br>कराड | पुणे<br>कोल्हापूर<br>कराड | | | | शातंनि औरंगाबाद दि.०४-१२-२००७ ते ३१-०७-२०१० ( २ वर्षे ८ महिने )<br>शातंनि उस्मानाबाद दि. ०१-०८-१० ते आजपर्यंत ( दि. १२ वर्षे १० महिने ) |

\# संबंधित अध्यापकांच्या सध्याच्या पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून आजतागायत कार्यरत असलेला सेवाकाळाचा तपशील संस्थानिहाय अचुक दिनांकासह रकाना क्रमांक १९ मध्ये दर्शविण्यात यावा.

| |
|---|
| माहिती तयार करताना Sakal Marathi या Font चा वापर करावा अन्य कोणत्याही Font मध्ये माहिती पाठवू नये व माहिती Excel मध्ये सादर करावी. |
| विभागीय कार्यालयांनी त्यांच्या अधिपत्याखालील संस्थांची माहिती अचूक असल्याची खातरजमा करून एकत्रित विभागप्रमुख व अधिव्याख्याता यांची विद्याशाखानिहाय माहिती सादर करावी.<br>संस्थेकडून आलेली माहिती सादर करू नये. |
| एका अध्यापकाच्या माहितीसाठी एकच ओळ वापरावी. Multipal Lines मध्ये माहिती देवू नये. (Alt+Enter चा वापर करावा) |
| अध्यापकांचे संपूर्ण नाव देण्यात यावे |
| तारीख नमूद करताना DD-MM-YYYY या Format मध्ये नमूद करावी. तारीख नमूद करताना - शिवाय कोणतेही इतर चिन्ह (/, .) वापरू नये. |
| ज्या संस्थांमध्ये द्वितीय पाळीची पदे मंजूर आहेत परंतू द्वितीय पाळी सुरु नसल्यास द्वितीय पाळीतील पदे दर्शवून तसे स्पष्टपणे नमूद करावे. |
| दिनांक१४-०७-२०२१ च्या संवर्ग विभाजनाच्या शासन अधिसुचनेनुसार ज्या अध्यापकांच्या नियुक्त्यांना १ वर्षापेक्षा कमी कालावधी झालेला आहे अशा अध्यापकांच्या नावासमोर # चिन्ह दर्शवावे |
| अध्यापकांची माहिती दर्शविताना सध्या ते ज्या पदावर कार्यरत आहेत त्या पदावरील रूजू दिनांकापासूनची माहिती प्रपत्र क मधील रकाना क्रमांक २१ मध्ये दर्शवावी |

प्रपत्र ब

## शिक्षकीय तदर्थ व्यवस्थेने प्रशासकीय पदावर ३ ( तीन ) वर्षापेक्षा कमी कालावधी कार्यरत अध्यापकांच्या विनंती / मान्यवरांच्या शिफारशीसह माहिती

( प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्याता )

| अ.क्र | शासकीय सेवकाचे नाव | पदनाम | विद्याशाखा | मूळ वेतन/ वेतन पे मॅस्ट्रिक्स/ लेव्हल | जन्मतारीख | सेवानिवृत्तीचा दिनांक | सध्याच्या पदाचा नियमित नियुक्तीचा प्रकार पदोन्नती / नामनिर्देशन | सध्याच्या पदाचा नियमीत नियुक्तीचा दिनांक | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेचे नाव | सध्याच्या संस्थेत कार्यरत असल्याचा दिनांक | अन्यत्र प्रतिनियुक्ती असल्यास त्या संस्थेचे नाव व कालावधी | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेतील एकूण सेवा कालावधी ( नक्षलग्रस्त / आदिवासी भागात कार्यरत स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावा (दि.३१.०५.२०२३पर्यंत) | विनंती बदली असल्यास विनंती बदलीचे ठीकाण | विनंती बदलीसाठीचे तपशिलवार कारण व त्याबाबतची समर्थनिय कागदपत्रे ठिकाण | तक्रारीमुळे बदली करणे अथवा अन्य कारणामुळे बदली न करणे इत्यादी अपेक्षित असल्यास त्याबाबतचे सुस्पष्ट अभिप्राय | सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ मधील तरतूदीचया अनुषंगाने संस्था प्रमुख / सहसंचालकांची शिफारस | कार्यरत असलेल्या पदावर यापूर्वी विविध संस्थेतील सेवाकाळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| १ | श्री. अ ब क | अधिव्याख्याता | स्वयंचल | ५६१०० Level ९A | ०१-०१-१९८१ | ३१-१२-२०४१ | नामनिर्देशन | ३१-१२-२०१० | शातंनि. वाशिम | २८-०८-२०२० | | २ वर्ष ९ महिने | नांदेड हिंगोली जिंतूर | वृध्द वडीलांच्या उपचाराकरीता व स्वग्राम असल्याकारणाने | | | शातंनि उस्मानाबाद दि.३१-१२-२०१० ते २७-०८-२०२० (१० वष ९ महिने) शातंनि वाशिम दि.२८.०८.२०२० ते आजपर्यंत ( २ वर्षे ९ महिने ) |

\# संबंधित अध्यापकांच्या सध्याच्या पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून आजतागायत कार्यरत असलेला सेवाकाळाचा तपशील संस्थानिहाय अचुक दिनांकासह रकाना क्रमांक १८ मध्ये दर्शविण्यात यावा.

प्रपत्र अ

## शिक्षकीय तदर्थ व्यवस्थेने प्रशासकीय पदावर ३ ( तीन ) वर्षापेक्षा जास्त कालावधी कार्यरत अध्यापकांच्या प्रशासकीय बदलीसाठी

### ( प्राचार्य / विभागप्रमुख / अधिव्याख्याता)

| अ.क्र | शासकीय संवकाचे नाव | पदनाम | विद्याशाखा | मूळ वेतन/ वेतन पे मॅट्रिक्स/ लेव्हल | जन्मतारीख | सेवानिवृत्तीचा दिनांक | सध्याच्या पदाचा नियमित नियुक्तीचा प्रकार पदोन्नती / नामनिर्देशन | सध्याच्या पदाचा नियमीत नियुक्तीचा दिनांक | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेचे नाव | सध्याच्या संस्थेत कार्यरत असल्याचा दिनांक | अन्यत्र प्रतिनियुक्ती असल्यास त्या संस्थेचे नाव व कालावधी | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेतील एकुण सेवा कालावधी ( नक्षलग्रस्त / आदिवासी भागात कार्यरत स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावा (दि.३१.०५.२०२३पर्यंत) | प्रशासकीय बदलीसाठी वैयक्तीक पसंतीची तीन ठिकाणे | विनंती बदली असल्यास विनंती बदलीचे टीकाण | विनंती बदलीसाठीचे तपशिलवार कारण व त्याबाबतची समर्थनिय कागदपत्रे ठिकाण | तक्रारीमुळे बदली करणे अथवा अन्य कारणामुळे बदली न करणे इत्यादी अपेक्षित असल्यास त्याबाबतचे सुस्पष्ट अभिप्राय | सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ मधील तरतूदीच्या अनुषंगाने संस्था प्रमुख / सहसंचालकांची शिफारस | कार्यरत असलेल्या पदावर यापूर्वी विविध संस्थेतील सेवाकाळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ |
| १ | श्री. अ ब क | अधिव्याख्याता | स्वयचल | ५६१०० Level ९A | ०३-०४-१९८२ | ३०-०४-२०४२ | नामनिर्देशन | ०४-१२-२००७ | शातंनि उस्मानाबाद | ०१-०८-२०११ | | ११ वर्ष १० महिने | पुणे कोल्हापूर कराड | पुणे कोल्हापूर कराड | | | | शातंनि औरंगाबाद दि.०४-१२-२००७ ते ३१-०७-२०११ ( ३ वर्षे १० महिने ) शातंनि उस्मानाबाद दि. ०१-०८-२०११ ते आजपर्यंत (११ वर्षे १० महिने) |

# संबंधित अध्यापकांच्या सध्याच्या पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून आजतागायत कार्यरत असलेला सेवाकाळाचा तपशील संस्थानिहाय अचुक दिनांकासह रकाना क्रमांक १९ मध्ये दर्शविण्यात यावा.

सहसंचालक, विभागीय कार्यालय, यांची स्वाक्षरी व शिक्का

विवरणपत्र - ड

संस्थेचे नाव :

| अ.क्र. | विद्याशाखा | मंजूर पदे | | | भरलेली पदे | | | रिक्त पदे | | | कार्यरत अध्यापकाचे संपूर्ण नाव | कार्यरत अध्यापकांपैकी असाधारण रजा/ प्रसूती रजा/ बालसंगोपन रजा/ प्रतिनियुक्तीवर असल्यास त्यांची नावे | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये सदर विद्याशाखेत प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रथम पाळी | द्वितीय पाळी | एकूण | प्रथम पाळी | द्वितीय पाळी | एकूण | प्रथम पाळी | द्वितीय पाळी | एकूण | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | | |
| | | | | | | | | | | | | | |

(प्रपत्र ड संस्थानिहाय सादर करावे. ज्या संस्थांमध्ये द्वितीय पाळीची पदे मंजूर आहेत परंतु अद्याप तेथे द्वितीय पाळी सुरू झाली नसल्यास द्वितीय पाळीची पदे दर्शवून तसे स्पष्टपणे नमूद करावे. तसेच द्वितीय पाळी बंद केली असल्यास तसे नमूद करुन पदे दर्शविण्यात यावीत.)